माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/०००७१८**

**अपिलार्थी श्री. राजेंद्रकुमार त्रिवेदी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (पोल-२)**
गृह विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ३२

**प्रथम अपिलीय अधिकारी**
गृह विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ३२

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.०५.२०२६</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २६.१०.२०२४ | १८.११.२०२४ | २६.१२.२०२४ | २९.०१.२०२६ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २०.०३.२०२५ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थींनी दि. २६.१०.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार Copy of the decision (containing reasons) refusing sanction to prosecute (vide your letter OW. H.D 12010/18/2024-POL2-MHD-Home Department, dated: Commissioner of Police, Mumbai. Deven Bharati- the then 18/11/2024) Shri. Subodh Kumar Jaiswal- the then Joint Commissioner of Police, Mumbai, Dr. Ravindra Anant Shiswe- the then Additional Commissioner of Police (Special Branch), Mumbai, Shashikumar Meena- the then Deputy Commissioner of Police. Zone-L Mumbai, Milind Khetle- the then Assistant Commissioner of Police, Azad Maidan Division, Mumbai, Bhushan Belnekar- the then Senior Police Inspector, Azad Maidan Police Station, Fort, Mumbai and other police officers in respect of complaint i.e. in Misc. Case bearing No. MISC/6402714/2022 lodged by Shri. Rajendrakumar Trivedi pending before the Hon'ble Metropolitan Magistrate, 28 Court, Mumbai taken by the Home Department, Mantralaya, Mumbai. 2. Copy of the note put up along with the office notings duly signed by the Under Secretary, Deputy Secretary, Additional Chief Secretary (Home), Home Department in the file prepared and maintained by Home Department, Desk-Pol-2. 3. Copy of the opinion of the Advocate General of the State of Maharashtra, Public Prosecutor, High Court of Bombay, received if any on the aforesaid complaint.

..२/-

4. Copies of the recommendations, remarks received from the director General of Police, Maharashtra State, Mumbai, if any. 5. The photocopy of the entire note-sheet containing the notings regarding grant or refusal of sanction in to prosecute Shri. Subodh Kumar Jaiswal- the then बाबत माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. २६.१२.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांनी त्यांचे दि. १८.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १९७ अन्वये खटला दाखल करण्यास परवानगी नाकारली आहे. माहिती अधिकारांतर्गत सदर नाकारण्यात आलेल्या परवानगी संदर्भात कार्यालयीन टिपणणी व माहितीची मागणी केली होती. त्यांना फक्त जन माहिती अधिकारी यांनी उशिराने कळविले की, सदर माहिती त्रयस्थ पक्षाशी संबधित असल्याने माहिती नाकारण्यात येत आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने ऑनलाईन कळविले होते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत सादर केलेला आपला दि. २६.११.२०२४ रोजीचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला झाला असुन, सदर अर्जान्वय आपण विचारणा केलेल्या माहितीच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ पोटकलम (त्र) मधील तरतुदीनुसार तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १७.१०.२०१४ च्या परिपत्रकानुसार वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यांवर नसल्याचा निर्णय स्पेशल लीव्ह पिटीशन क्र. २७७३४/२०१२ गिरीश रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग या प्रकरणात दि. ०३/१०/२०१२ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. त्यामुळे जी त्रयस्थ पक्षाबरोबर उध्दभवलेल्या वैयक्तिक वादाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती आपणांस देता येणार नाही.

५. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. २९.०१.२०२६ रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २६.११.२०२५ रोजीच्या अर्जात नमूद मुद्दा क्र. ४ मधील (iii) a,b,c,d मध्ये अपेक्षिलेली माहिती संकलित करुन ती संख्येत उपलब्ध करुन द्यावी असे आदेशित करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, परंतु आदेशात स्पष्टता नाही की, त्यांनी कोणत्या मुद्दयांची माहिती देण्याचे आदेशित केले आहे.

सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

पुढील सुनावणीस तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी श्री. व्यंकटेश भट तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १९.०५.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

**मुंबई**
**दिनांक : ०४.०५.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**